दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

• वर्ष १६ वे • अंक १३९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१२ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# राज्यात रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, शॉपिंग मॉल्सला रात्री १० वाजेपर्यंत परवानगी

## १५ ऑगस्टपासून अंमलबजावणी ; आरोग्यमंत्री राजेश टोपेंची माहिती

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**राज्यात रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, शॉपिंग मॉल्सला रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यात राज्यात सर्व ठिकाणी आता रेस्टॉरंट्स, हॉटेल्सला ५० टक्के क्षमतेनं रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १५ ऑगस्टपासून होणार आहे, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली.**





राज्याच्या कॅबिनेट बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषेदेत राजेश टोपे यांनी निर्णयांची माहिती दिली. राज्यात आता निर्बंधांबाबत शिथिलता देण्याचा महत्वापूर्ण निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला असून यात रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि शॉपिंग मॉल्स १५ ऑगस्टपासून रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवता येणार आहेत. हा निर्णय संपूर्ण राज्यासाठी लागू असणार आहे, असं राजेश टोपे यांनी स्पष्ट केलं. त्यामुळे हॉटेल आणि रेस्टॉरंट्स मालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कोरोना प्रादुर्भावाच्या तिसऱ्या लाटेचा धोका तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे याची काळजी घेण्याच्या दृष्टीनं एक महत्वाचा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे. राज्यात निर्बंधांमध्ये शिथिलता देण्यात आली असली जरी ज्या दिवशी राज्याची ऑक्सिजनची मागणी ७०० मेट्रीक टनच्या वर पोहोचे तेव्हा राज्यात लगेच कडक लॉकडाऊन जारी केला जाईल असा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याचं राजेश टोपे यांनी यावेळी सांगितलं.

### शॉपिंग मॉल्समध्ये दोन डोस घेतलेल्यांना परवानगी

राज्यातील शॉपिंग मॉल्सला रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली असली तरी मॉल्समध्ये कोरोना विरोधी लसीचे दोन डोस घेतलेल्या ग्राहकांनाच प्रवेशाची परवागनी देण्यात येईल, असंही राजेश टोपे यांनी सांगितलं.

### मंगलकार्यालांसाठी मर्यादा वाढवली

लग्नकार्यासाठी खुल्या जागेवर २०० माणसांना तर बंद हॉलमध्ये निम्म्या क्षमतेच्या किंवा १०० माणसांपर्यंत उपस्थितीची परवानगी देण्यात आली आहे. हा निर्णय देखील १५ ऑगस्टपासून लागू होणार आहे, असं टोपे यांनी सागितलं आहे.

# उघड्या जागेवर जुगार खेळल्याप्रकरणी १४ जणांविरुद्ध कारवाई ; १५ लाखाचा ऐवज जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उघड्यावर जुगार खेळल्याप्रकरणी १४ जणांविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

तळोजा परिसरातील देवीचापाडा येथे एका शेतातील बांधलेल्या ताडपत्रीच्या झोपडीमध्ये बेकायदेशीररित्या जुगार खेळला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळताच सदर ठिकाणी छापा मारुन त्या ठिकाणावरुन रोख रक्कम, दुचाकी व चार चाकी वाहने व इतर ऐवज असा मिळून १५,१५,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून या प्रकरणी १४ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. या गुन्ह्याची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# चुकीच्या कचरा डंपिंगमुळे आदिवासीवाडी वरील विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात

## सुंदर माणगांव आरोग्यपूर्ण स्वच्छ माणगांवसाठी लक्षवेधा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

कोरोना वैश्विक महामारी आणि स्वच्छतेला महत्व किती? या पार्श्वभुमीकडे पाहता उतेखोल आदिवासी वाडी आणि वनवासी आश्रम शाळ-जवळील परिसरात उघड्या जागेत माणगांवचा कचरा डंपिंग केला जातो. परंतु हा कचरा योग्य रितीने डंप न केल्याने उतेखोल आदिवासी वाडी कडे जाणाऱ्या एकमेव रस्त्यावर पसरला आहे. संबंधित कचरा वाहतुक करणाऱ्या यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे अस्वच्छतेचे भयावह चित्र आपणास पाहावयास मिळत आहे. परिणामी आदिवासी वाडीवरील ग्रामस्थ, लहान मुले तसेच शाळेत जाणारे विद्यार्थी आजारी पडत आहेत. यामुळे वाडीतील सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे.

याबाबत नगरपंचायत प्रशासनाकडे माहीती देऊनही दूर्लक्ष केले जात असल्याची तक्रार आश्रमशाळेच्या व्यवस्थापनाकडुन तसेच येथिल आदिवासी वाडी वरील चंद्रकांत शंकर वाघमारे, प्रकाश काशीराम पवार, रवि रामचंद्र पवार, लक्ष्मी नारायण जाधव, रामा म्हादू कापरे या ग्रामस्थांनी नैराश्यपूर्ण भावनेतून पत्रकारांजवळ व्यक्त केली आहे. गेल्या वर्षी देखील याच कचरा आणि घाणी विषयी नगरपंचायत प्रशासनास माहीती देऊन ही त्याची योग्य ती दखल घेतली गेली नाही व रोजच हा कचरा येथे रस्त्यात टाकला जात आहे.

आम्ही वाडीवरील लोकांनी या ठिकाणी कचरा गाडी घेऊन येणाऱ्या सफाई कामगारांना देखिल अनेक वेळेस कचरा येथे .../२



## संक्षिप्त...

### कोरोनामुळे अनाथ झालेल्या बालकांना नोकरी, शिक्षणात १ टक्के आरक्षण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात कोरोना प्रादुर्भावामुळे पालक गमावलेल्या बालकांसाठी ठाकरे सरकारनं महत्वाचा निर्णय घेतला आहे. कोरोनामुळे अनाथ झालेल्या बालकांना नोकरी आणि शिक्षणात १ टक्के आरक्षण दिलं जाणार असल्याची घोषणा राज्याच्या महिला व बालविकास मंत्री योशमती ठाकूर यांनी केली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत आज कॅबिनेट बैठक पार पडली. बैठकीत काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. यात राज्यातील अनाथ बालकं आणि एकल महिलांसाठी महत्वपूर्ण निर्णयांची घोषणा करण्यात आली आहे. कोरोनामुळे पालकांचा मृत्यू झाल्यानं अनाथ झालेल्या बालकांची जबाबदारी राज्य सरकारनं घेतली होती. त्यानंतर आता अनाथ बालकांच्या भविष्याच्या दृष्टीनं त्यांना नोकरी आणि शिक्षणात १ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह ही केंद्र पुरस्कृत सुधारित योजना राज्यात राबवली जाणार आहे. तसंच राज्यात महिलांसाठी ५० हॉस्टेल्स उभारली जाणार असल्याचीही माहिती यशोमती ठाकूर यांनी दिली आहे.

# महागृहनिर्माण योजनेतील अर्जदारांनी घरांचा ताबा देण्यासंदर्भात कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये, सिडकोचे आवाहन


**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना २०१८-१९ यशस्वी अर्जदारांना १ जुलै २०२१ पासून घरांचा (सदनिकांचा) ताबा देण्याचा निर्णय सिडकोकडून यापूर्वीच घेण्यात आला असून या संदर्भात संबंधित अर्जदारांनी कोणत्याही भूलथापांना किंवा आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे. तसेच घरांचा ताबा देण्यासाठी सिडकोने कोणत्याही मध्यस्थ संस्था/व्यक्ती किंवा प्रतिनिधीची (एजंट) नियुक्ती केलेली नाही, असे स्पष्टीकरणही सिडकोकडून देण्यात आले आहे.

सिडकोने कोविड-१९ महासाथ व त्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या काळात निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, २०१८-१९ महागृहनिर्माण योजनेतील घरांचे बांधकाम युद्धपातळीवर पूर्ण केले व १ जुलै २०२१ पासून यशस्वी अर्जदारांना टप्प्याटप्प्याने घरांचा ताबा देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, घरांचा ताबा देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

घरांचा ताबा देण्यासंदर्भात कोणत्याही व्यक्तिने अथवा संस्थेने कोणत्याही प्रकारचे आमिष दाखवल्यास अर्जदारांनी त्यावर विश्वास ठेवू नये. कारण याकरिता कोणत्याही मध्यस्थ संस्था/व्यक्ती किंवा प्रतिनिधीची सिडकोकडून नियुक्ती करण्यात आलेली नाही. योजना पुस्तिकेमध्ये नमूद प्रक्रियेनुसारच घरांचा ताबा देण्यात येत आहे. या संदर्भातील .../२

# खोपोली-शीळफाटा येथे ट्रकचा भीषण अपघात २ ठार



**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई -पुणे महामार्गावरील खोपोली शीळफाटा येथील उतार अपघातांचे केंद्र बनले आहे. मागील एक महिन्यात या ठिकाणी चार भीषण अपघात घडले आहेत. मंगळवारी सकाळी साडे आठ वाजण्याच्या सुमारास पुणे बाजूकडून येणारा मालवाहतूक ट्रक अनियंत्रित होऊन उलटला व भीषण अपघात घडला. यात ट्रक चालक व एक पादचारी असा दोघांचा मृत्यू झाला आहे. सुदैवाने सदर ट्रक काही अंतरावर उभे असलेल्या १८ ते २० कामगारांच्या समूहापासून थोड्याच अंतरावर उलटला नाहीतर फार मोठी जीवितहानी व भयंकर परिस्थिती या अपघाताने निर्माण झाली असती.

या बाबतीत मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी साडे आठ वाजण्याच्या सुमारास खंडाळा घाट मार्गे पुणे बाजू कडून माल वाहतूक ट्रक MH 46 GF 0381 शीळफाटा येथील उतारावरून येत असताना, रायगड बाजार जवळ हा ट्रक अनियंत्रित झाला व रस्त्या लगत उभ्या असलेल्या क्रेनला धडकून उलटला. यात धोंडू लक्ष्मण सावंत वय ६० रा. नंदनपाडा-डोनवत यांचा ट्रक खाली चेपले जाऊन जागीच .../२

# पनवेल शहरातील मालमत्ता कराच्या सवलतीची मुदत वाढवली

## शिवसेनेचे प्रथमेश सोमण यांचे यशस्वी प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल शहरातील नागरिकांना मालमत्ता करतील ५% सवलत मुदत आता ३१ जुलै वरून ३० ऑगस्ट करण्यात आली आहे. पनवेल महापालिका क्षेत्रात सध्या मालमत्ता कराचा विषय खूप मोठ्या प्रमाणात गाजत आहे.परंतु सिडको व्यतिरिक्त जुन्या नगरपालिका क्षेत्रातील मूळ पन-वेल शहरातील नागरिकांना नेहमीप्रमाणे प्रॉपर्टी टॅक्स च्या बिलांचे वाटप करण्यात आले.

ऑगस्टच्या पहिल्या- दुसऱ्या आठवड्यात नागरिकांकडे प्रोपर्टी टॅक्स ची बिले पोहोचल्यावर त्यामध्ये पाच टक्के सूट दर्शवण्यात आली परंतु ही सवलत ३१ जुलैपूर्वी कर भरणाऱ्यांसाठी होती. मूलतः टॅक्सची बिल हीच ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात लोकांना प्राप्त झाल्यावर ही पाच टक्के सवलत नागरिकांना कशी मिळणार असा प्रश्नच तयार झाला कोविड मुळे २०२०-२०२१ व आताची २१-२२ अशी एकूण रक्कम या बिलांमध्ये दिली गेली असल्याने रक्कमही मोठी होती. अशा परिस्थितीत पाच टक्के मिळणारी सवलत ही सामान्य माणसासाठी अत्यंत आवश्यक .../२

# माथेरान नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा ठरली वादळी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सत्ताधाऱ्यांचे अनेक चुकीचा विषय विरोधकांनी हाणून पाडले. विविध पस्तीस विषयांवर नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरन्ससिंगद्वारे नगरपरिषदेचा सर्वसाधारण सभेचे अयोजन करण्यात आले होते. माथेरान नगरपरिषदेत एकहाती सत्ता होती परंतु यातील ९ नगर-सेवक व एक स्विकृत सदस्य यांनी मनमानी कारभार व हुकूमशाहीचे कारण सांगत काही महिने आधि पक्षाचा त्याग केला होता. तेही विरोधात उतरल्याने सत्तेला सुरूंग लागताना दिसत आहे.

माथेरान नगरपरिषदेचा रुग्णवाहीकेचा खर्चाचा मुंजुरीचा विषयावर शिवाजी शिंदे हे अक्रमक होत गाडीचा वापर लोकप्रतिनिधींकडून व अधिकाऱ्यांकडूनच होत आहे या रुग्णवाहीकेचा वापर करताना आपले दोन्ही पाय शाबूत आसताना गाडीचा गैरवापर करणाऱ्यांनी जनाची नाही तर मनाची लाज बाळगावी असा जहाल प्रहार केला. या रुग्णवाहीकेचा दिवस रात्र अनेक फेऱ्या होत आसताना नुकसानी मध्ये कशी जाते यावर प्रश्न उपस्थित करुन अगामी काळात या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्या खेरीज शांत बसणार नाही हे सांगितले.कपाडिया मार्केट या मध्ये नविन गाळे झालेत ते लिलाव पद्धतीने किंवा यासाठी कोण पात्र आसतील,किती महिन्याचा कराराने व गाळे बंद ठेवल्यास ते नगरपरिषद परत घेईल तसेच या गाळे वाटपात महिला बचत गट,अपंगाना सामावून घ्यावे या सर्व प्रकियेची पहिली पॉलीसी ठरवुन सभागृहा समोर आणावे असे एकमत सर्व सदस्यांनी व्यक्त केले. कपाडीयाॅ मार्केट मधील गाळा कोवीड १९उपाययोजनेसाठी ताब्यात घेणे हा विषय जेव्हा सभा पटलावर आला तेव्हा सभेत संतप्त सदस्यांनी असा विषय घेण्यामागे कारण काय आहे आणि दुसरीकडे येवढ्या जागा आसताना आपण या गाळ्याचा विषय का घेतला यासाठी संपूर्ण विरोधकांनी आक्रमकता दाखवुन निषेध व्यक्त केला व एखाद्या माणसाचा रोजी रोटीवर घाला घालुन त्याला दबावात आणले जात आहे. अशा दबावतंत्राला भिख घालणार नाही व हा विषय मतावर घेतला जावा व आमचा ११जणांचा याला विरोध आहे हे याची नोंद करावी असे विरोधी नगरसेवक प्रियंका कदम, उपनगराध्यक्ष अकाश चौधरी यांनी सांगितले. विरोधकांनी एकत्र होऊन सदर विषय हाणुन पाडला. गेल्या साडेचार वर्षे या सभागृहाने विरोधक म्हणुन शिवाजी शिंदे यांचा आवाज ऐकला होता परंतु या सभेपासुन कॉग्रेस बरोबर पक्ष त्याग करणारे सदस्य उतरल्याने .../२



# उरणच्या तहसिलदारांना हरदास समिती शिफारशींच्या विरोधात अनुसूचित जमातीचे निवेदन

**दै.रायगड नगरी । उरण**

अनुसूचित जमातीच्या कोळी महादेव, डोंगर कोळी, कोळी मल्हार, कोळी ढोर, टोकरे, कोळी ठाकूर, ठाकर, कातकरी, काथोडी, मन्नेरवारलू , मल्लेवार, हलवा माना, तडवी भिल्ल इत्यादी ३३ अनुसूचित जमातींना वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी आदिवासी विकास विभागाने उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश प्रताप.व्ही.हरदास यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयानुसार एक समिती गठित करण्यात आली होती.



या समितीने दिनांक २९ मे २०१९ रोजी अहवाल आदिवासी विकास विभागात सादर केलेला होता. सदर अहवालावर हरकती घेण्यासाठी व सूचना करण्यासाठी या अहवालाची प्रत संबंधित अनुसूचित जमातीच्या बांधवांना उपलब्ध करून न देता आदिवासी विकास विभागाने सदर अहवाल दडपून ठेवला होता. पुढे अचानक ७ मे २०२१ रोजी शासन निर्णय पारित करून हरदास समितीच्या अहवाला-तील १४ सोयींचा शिफारशींचा स्वीकार केला गेला.

परंतु या समितीच्या शिफारसी अनुसूचित जमातींना वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी नसून अनुसूचित जमातीच्या अडचणीत वाढ करण्यासाठी आहेत असे ठाम मत राज्यस्तरीय आदिवासी कोळी समाज समन्वय समितीचे मुख्य समन्वयक शरदचंद्र जाधव यांनी व्यक्त करून या शासन निर्णया विरुद्ध आवाज उठविला आहे. दिनांक ९ ऑगस्ट २०२१ रोजी आदिवासी दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे .../२

# परेश ठाकूर यांच्या हस्ते सार्वजनिक सभागृहाचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । पनवेल**



आपल्या नगरसेवक निधीतुन विकास कामांना सातत्याने प्राधान्य देत प्रभागात नवनवीन सुधारणा घडवून आणणारे पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १७ चे भाजपचे नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी नगरसेवक निधीतुन शिवाजी नगर, पनवेल एस. टी. डेपोच्या बाजुला, पनवेल रेल्वे स्टेशन रोड या ठिकाणी उभारलेल्या सार्वजनिक सभागृहाचे तसेच बोअर वेलचे (हातपंप विहीर) लोकार्पण कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते नुकताच करण्यात आले.

यावेळी प्रभाग समिती 'ड' सभापती सुशिला घरत, नगरसेवक ॲड मनोज भुजबळ, नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, विजय म्हात्रे, प्रशांत फुलपगार, जितेंद्र वाघमारे, विनोद जोशी सर, अशोक आंबेकर, श्याम साळवी, रावसाहेब खरात, राहुल वाहुलकर, सतीश बोर्डे, विजय झरे, किशोर वाहुलकर, दिपक वाहुलकर, रुपेश वाहुलकर, आनंद जाधव, नंदा टापरे, झरीना शेख, शैला आंबेकर, लक्ष्मी चव्हाण आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीवर्धन शहरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला, नागरिकांमधून संताप ; नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहरामध्ये मागील काही दिवसांपासून डासांच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. कारण श्रीवर्धन नगरपरिषदेकडून डासांवरती नियंत्रण मिळवण्यासाठी किंवा डास मारण्यासाठी कोणतीही उपाययोजना करण्यात येत नाहीये.

काही वर्षांपूर्वी श्रीवर्धन शहरातील नागरिक आपल्या घरातील सांडपाणी शोष खड्डा खोदून त्यामध्ये सोडत असत. परंतु आता नवीन फ्लॅट संस्कृती आल्यामुळे अनेक इमारतींमधील पाणी उघड्या गटारांमध्ये सोडले जात असल्यामुळे डासांची संख्या मोठ्या प्रमाणावरती वाढत आहे. अनेक ठिकाणी ठेवलेले गाड्यांचे टायर, रिकामे पत्र्याचे डबे किंवा रिकाम्या करवंट्या यामध्ये पावसाचे पाणी साठल्या नंतर त्यामध्ये डासांची उत्पत्ती होत असते. या डासांमुळे चिकुनगुनिया सारखे आजार होत असतात. श्रीवर्धन शहरात अनेक जणांना तापाची साथ जाणवत आहे. मात्र बहुतांश नागरिक खाजगी दवाखान्यात जात असल्यामुळे व खाजगी रक्ततपासणी केंद्रांमध्ये जात असल्यामुळे मलेरिया झाला तरी, खाजगी दवाखान्यात उपचार घेऊन बरे होत आहेत. श्रीवर्धन शहरात नगरपरिषदेकडून कचरा उचलण्याचे काम अतिशय स्तुत्य पणे केले जात असले तरीही नगरपरिषदेने ज्या ठिकाणी गटारात सांडपाणी तुंबते किंवा पावसाचे पाणी तुंबते अशा ठिकाणी कीटकनाशक फवारणी करण्याची आवश्यकता आहे.पावसाचे पाणी साठून राहते अशा खराब वस्तू नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जिल्ह्यातील इतर शहरांपेक्षा श्रीवर्धन शहर खरोखरच स्वच्छ ठेवण्यात नगरपरिषदेने चांगले काम केलेले आहे. परंतु डासांवरती नियंत्रण मिळवण्यासाठी नगर परिषदेने आता पावले उचलण्याची गरज आहे.

# पत्रकार विश्वास निकम आदिवासी मित्र पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

दक्षिण रायगड आदिवासी हितरक्षक संघटना रायगड व रायगड जिल्हा एकलव्य आदिवासी संघटना रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने नऊ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून आदिवासी समाजासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले असून यावेळी गोवे कोलाड येथील पत्रकार विश्वास सकाराम निकम यांना आदिवासी मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



विश्वास निकम यांनी अनेक वेळा आदिवासी समाजाच्या जनहिताचे काम केले आहे. तर कोरोना काळात रायगड जिल्हा विविध संघटने मार्फत दिल्या जाणाऱ्या जीवनावश्यक वस्तू वाटप करण्यासाठी सुमारे ४० ते ४५ डोंगर दऱ्यातील वाड्या वस्त्यांवर जाऊन प्रत्यक्ष जाऊन काम केले आहे. यामुळे पत्रकार विश्वास निकम यांना आदिवासी मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

यावेळी गोरेगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नावले, कोलाड ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव, माणगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आश्वानाथ खेडेकर, ॲड. योगेश तेंडुलकर, फादर रिची भाऊ,पत्रकार संतोष सुतार, महादेव जाधव, माजी कृषी अधिकारी काप, संजय घाग, यांचा ही पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य दयाराम पवार, रजिप सदस्या वासंती वाघमारे, देऊ हिलम, बबन कोळी, संजय कोळी, सुदाम जाधव, नथुराम वाघमारे, नामदेव हिलम, दिनेश कातकरी, रायगड जिल्ह्यातील असंख्य आदिवासी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन भिवा पवार व राजेंद्र पाटील यांनी केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकतीमधील त्या मिळकतीसमोर लिहिलेल्या मालकांपैकी मालक श्रीमती.शांतीबाई काशिनाथ केणी हे त्यांचा मुलगा म्हणजेच आमचे अशिल नामे श्री.भिमसेन काशिनाथ केणी यांना त्यांचा अविभाज्य हिस्सा कायमस्वरुपी बक्षिसपत्राने देणार आहेत. सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड बक्षिसपत्र करणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालकाचे नाव | संचिका क्र. | स्थळ | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री.बळीराम भिवा केणी<br>२) श्री.धनराज काशिनाथ केणी<br>३) श्री.देवराज जनार्दन केणी<br>४) श्रीमती.शांतीबाई काशिनाथ केणी | CHIM-ICIG-55 | वडघर (पुष्पक नोड) | आर २ | १२८ | ६५० चौ.मी. (पैकी त्यांचा अविभाज्य हिस्सा) |

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर बक्षिसपत्र पूर्ण करतील व सदरचे बक्षिसपत्र रजिस्टर्ड करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/०८/२०२१

**सही/-**
**कु.दिपाली रामदास गावंड**
**(ॲडव्होकेट हायकोर्ट)**
**शॉप नं.९, रचना रेसिडेन्सी, ए विंग, टिळक रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकतीमधील त्या मिळकतीसमोर लिहिलेल्या मालकांपैकी मालक १) श्री.अनिल जनार्दन केणी हे त्यांचे सख्खा भाऊ म्हणजेच आमचे अशिल नामे श्री.सुधीर जनार्दन केणी यांना त्यांचा अविभाज्य हिस्सा बक्षिसपत्राने देणार आहेत. सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड बक्षिसपत्र करणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालकाचे नाव | संचिका क्र. | स्थळ | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री.अनिल जनार्दन केणी<br>२) श्रीमती.मोहिनी राजेंद्र केणी<br>३) श्री.प्रसाद राजेंद्र केणी | CHMO-ICIG -225 | वडघर (पुष्पक नोड) | आर १ | २१ | १२० चौ.मी. (पैकी त्यांचा अविभाज्य हिस्सा) |

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर बक्षिसपत्र पूर्ण करतील व सदरचे बक्षिसपत्र रजिस्टर्ड करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/०८/२०२१

**सही/-**
**कु.दिपाली रामदास गावंड**
**(ॲडव्होकेट हायकोर्ट)**
**शॉप नं.९, रचना रेसिडेन्सी, ए विंग, टिळक रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकतीमधील त्या मिळकतीसमोर लिहिलेल्या मालकांपैकी मालक श्री.रावजी नथु ढमाले हे त्यांचा मुलगा म्हणजेच आमचे अशिल नामे श्री.शिवाजी रावजी ढमाले यांना बक्षिसपत्राने देणार आहेत. सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड बक्षिसपत्र करणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालकाचे नाव | संचिका क्र. | स्थळ | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री.रावजी नथु ढमाले<br>२) श्रीमती.रेश्मा वासुदेव ढमाले | CHID-ICIG -100 | वडघर (पुष्पक नोड) | आर ३ | २० | ३४० चौ.मी. (पैकी अविभाज्य हिस्सा) |

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर बक्षिसपत्र पूर्ण करतील व सदरचे बक्षिसपत्र रजिस्टर्ड करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/०८/२०२१

**सही/-**
**कु.दिपाली रामदास गावंड**
**(ॲडव्होकेट हायकोर्ट)**
**शॉप नं.९, रचना रेसिडेन्सी, ए विंग, टिळक रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.८९०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२४/०९/२०२१

श्री.समाधान जनार्दन कोळी — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार यांची आई कै.श्रीमती.विठाबाई जनार्दन कोळी यांचे दि.१३/०५/२०२१ रोजी एमजीएम हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले. मयत कै.श्रीमती.विठाबाई जनार्दन कोळी यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मालमत्ता परिशिष्ट**
**मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| २१७ | २३४/३ | ०-२१-० | ३.००.० |

मालमत्ता मुल्यांकन रुपये : ६,३६०/-

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.११/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.८५८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०९/२०२१

श्री.जॉहनी मोहनलाल पंजवानी
वय : ४४ वर्षे, धंदा :
दोघेही रा.फ्लॅट नं.५०१, प्लॉट नं.१८१
मोनॉर्च ॲम्बीनस, सेक्टर १०, खारघर नवी मुंबई,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार यांचे वडील कै.मोहनलाल होलाराम पंजवानी ह्या दि.२५/०४/२०२१ रोजी खारघर येथे मयत झाले आहेत. मयत कै. श्री.मोहनलाल होलाराम पंजवानी यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**परिशिष्ट**
**कै.मोहनलाल होलाराम पंजवानी (५० टक्के) यांचे नावे खालील वर्णनाची मालमत्ता आहे.**
**मालमत्ता वर्णन**
**फ्लॅट नं.५०१, प्लॉट नं.१८१, मोनॉर्च ॲम्बीनस, सेक्टर १०, खारघर, नवी मुंबई,**
**तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड एकूण क्षेत्रफळ : ७५ चौ.मी.**
**मालमत्ता मुल्यांकन : रुपये ६४,१९,०००/-**
**(रुपयै चौसष्ठ लाख एकोणीस हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.११/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.८५९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०९/२०२१

१) श्रीमती.मंगळा कृष्णा पवार
वय : वर्षे, धंदा : नील
२) श्री.प्रभाकर कृष्णा पवार
वय : वर्षे, धंदा :
दोघे रा.ए ३०४, चॅनल स्टॉर को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.१५, सेक्टर १६, कामोठे, नवी मुंबई,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार यांचे वडील कै.कृष्णा भिकाजी पवार हे दि.०८ जुलै २०१९ रोजी मु.पो.शिरंके, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी येथे मयत झाले आहेत. मयत कै.श्री.कृष्णा भिकाजी पवार यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**परिशिष्ट**
**कै.कृष्णा भिकाजी पवार (५० टक्के) यांचे नावे खालील वर्णनाची मालमत्ता आहे.**
**मालमत्ता वर्णन**
**ए ३०४, चॅनल स्टॉर को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.१५, सेक्टर १६, कामोठे, नवी मुंबई**
**तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६**
**एकूण क्षेत्रफळ : ३४३ चौ.फूट कारपेट**
**रुपये ३,१९,८६६/- (रुपये तीन एकोणीस हजार आठशे सहासष्ट मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.११/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## चुकीच्या कचरा डंपिंगमुळे आदिवासीवाडी वरील विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात

रस्त्यात टाकू नका, जरा पुढे जाऊन डंपिंगच्या जागेवर नेऊन टाका ! असे सांगुन देखिल कोणीही ऐकत नाही. या बाबत आम्ही कोणाकडे न्याय मागावा ? सध्याच्या महापूर परिस्थिती मुळे नगरपंचायत प्रशासन सध्या व्यस्त असल्याने आम्ही तक्रार करण्या साठी गेलो नाही परंतु आता पाणी गळ्यापर्यंत आल आहे वाडीतील एखादी व्यक्ती आजारी पडली तर त्याला दवाखान्यात ने-आण करण्यासाठी साधी रिक्षा ही या ठिकाणी येत नाही. रुग्णाला पालखी करुन चार किलोमिटर माणगांव शहरात न्यावे लागते. दुर्दैवी गोष्ट अशी कि माणगांव शहरापासून इतक्या जवळ असून देखील या ठिकाणी नगरपंचायतीची साधी पिण्याच्या पाण्याची नळाची लाईन गेली नाही. त्यामुळे नदीच्या पाण्यावर किंवा डबक्यातील पाणी पिण्यासाठी वापरावे लागते असे येथील ग्रामस्थ महिलांचे गाऱ्हाणे आहे. नगरपंचायत निवडणुकीत मतदान करतो पण आम्हांला कोणीही विचारत नाही मुलभुत सुविधा नाहीत अशी व्यथा या वाडीतील महिलांनी बोलुन दाखवली आहे. त्यामुळे संबधित प्रशासनाने आम्हा उतेखोल आदिवासी वाडी वासियांचे आरोग्य विषयक समस्येची तातडीने दखल घेऊन योग्य ती उपाय योजना करावी व सुंदर माणगांव आरोग्यपूर्ण स्वच्छ माणगांव साठी लक्ष वेधावे.

## भूलथापांना बळी पडू नये, सिडकोचे आवाहन

माहितीकरिता अर्जदारांनी केवळ सिडकोचे अधिकृत संकेतस्थळ, सिडकोचे फेसबुक, युट्यूब व ट्विटर पेज, सिडकोकडून काढण्यात येणारी प्रसिद्धी पत्रके यांवरच विश्वास ठेवावा किंवा सिडको कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच या संदर्भात मध्यस्थ किंवा प्रतिनिधी म्हणवणाऱ्या कोणत्याही व्यक्ती वा संस्थेकडून अर्जदारांची फसवणूक झाल्यास सिडको जबाबदार राहणार नाही.

## खोपोली-शीळफाटा येथे ट्रकचा भीषण अपघात २ ठार

मृत्यू झाला तर ट्रक चालक मोहम्मद परवेज शहाबुद्दीन वय २५ रा. बिहार गंभीर जखमी अवस्थेत एमजीएम रुग्णालयात नेत असतांना त्यांचा ही उपचारापूर्वीच मृत्यू झाला. सदर अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, खोपोली पोलीस व अपघातात ग्रस्तांच्या मदतीसाठी सक्रिय ग्रुपच्या सदस्यांनी मदतकार्य केले. प्रथम गंभीर जखमी असलेल्या चालकास बाहेर काढून एमजीएम रुग्णालयात पाठविण्यात आले.

## पनवेल शहरातील मालमत्ता कराच्या सवलतीची मुदत वाढवली

व गरजेचे होती. अनेक नागरिकांनी बिलेज उशिरा मिळाल्याबाबत शिवसेनेकडे तक्रार केल्यानंतर शिवसेनेचे महानगर संघटक व मा. नगरसेवक ॲड प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांसोबत आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेतली व नागरिकांच्या तक्रारी सांगून ही मुदत वाढवावी अशी आग्रहपूर्वक मांडणी केली. तसे निवेदनही दिले. शिवसेनेच्या मागणीला ताबडतोब सकारात्मक प्रतिसाद देत आयुक्त गणेश देशमुख यांनी लागलीच संबंधित अधिकाऱ्यांना सांगून ही मुदत ३० ऑगस्ट पर्यंत वाढविण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे मूळ पनवेल शहरातील नागरिकांना मालमत्ता कर भरताना पाच टक्के मिळणारी सवलत ही आता ३० ऑगस्टपर्यंत मिळणार असून त्यामुळे नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान वाचणार आहे. शिवसेनेच्या या त्वरित प्रयत्नानंतर पनवेलमधील नागरिकांनी शिवसेनेचे आभार मानले आहेत. यावेळी प्रथमेश सोमण यांचे सोबत उप महानगर संघटक सुनीत ठक्कर शहर , संघटक प्रवीण जाधव, महिला शहर संघटिका अर्चना कुलकर्णी व शाखाप्रमुख प्रसाद सोनवणे, युवासेनेचे कौस्तुभ सोमण उपस्थित होते.

## माथेरान नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा ठरली वादळी

विरोधाला धार येत आहे आणि अनेक चुकीचा विषयांची कत्तल होताना दिसत आहे.सत्ताधारी गटाकडे बहुमत नसल्याने तेही या संपूर्ण सभेत हातबल होते. या सभेत कर्मचारी गणवेश पुरवठा, शहराचा विविध भागात गॅबीयन वॉल टाकणे, व्हचुअल क्लास सुरु करणे विषयांना मंजुरी भेटली. लेक येथिल तलावातील गाळ काढणे या कामालाही विरोध करुन सत्ताधाऱ्यांचा अनेक मन सुंभयांवर पाणी फेरण्यात विरोधी पक्ष यशस्वी झाल्याने संपूर्ण शहरात या मॅरेथॉन चाललेल्या सभेची चर्चा चालु होती. इंदिरा नगर येथिल स्टेज तेथिल नागरीकांना परत दिला जावा हा विषय नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी अभ्यासपूर्ण मांडुन तो लवकरात लवकर द्यावा व तेथिल नागरीकांचा तिव्र भावनांचा आदर करावा हि गोष्ट सभागृहात मांडली या गोष्टीवर भरपुर वेळ सभागृहात चर्चा झाल्यावर किरण चावरे यांनी सभागृहाची दिशाभुल केली आहे हे स्पष्ट झाले आणि लवकरात लवकर सदर जागा इंदिरानगर वासीयांना दिली जाईल हे नगराध्यक्ष यांनी स्पष्ट केले व या वास्तुला आप्पा स्वारी यांचे नाव दिले जावे हे रुपाली आखाडे यांनी सुचना मांडली. आजचा सभेत सत्ताधारी गटनेते प्रसाद सावंत, अकाश चौधरी, प्रतिभा घावरे, सुषमा जाधव, राकेश चौधरी, नरेश काळे, राकेश चौधरी, संदीप कदम, सौ सोनावणे, चंद्रकांत जाधव यांनी सभेत अनेक चर्चांत सहभाग घेतला.

## शिफारशींच्या विरोधात अनुसूचित जमातीचे निवेदन

राज्यपाल, मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांच्यासह राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांना आदिवासी कोळी समाज समन्वय समितीच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले. या निवेदनात आदिवासी विकास विभाग प्रमाणपत्र तपासणीच्या नावाखाली अनुसूचित जमातींना संविधानिक हक्कापासून कसे वंचित करत आहे हे निवेदनात सविस्तरपणे मांडलेले आहे.हरदास समितीच्या अनेक बाबींना आदिवासी कोळी समाज समन्वय समितीचा विरोध असून या हरदास समितीच्या विरोधात आदिवासी दिनाचे औचित्य साधून उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आदिवासी कोळी समाज समन्वय समितीचे रायगड उपजिल्हा प्रमुख सदानंद कोळी, उरण तालुका प्रमुख-नरेश कोळी,सदस्य - मंगेश कोळी, शर्मिला कोळी, अजय कोळी, अशोक कोळी, प्रशांत कोळी, राणी कोळी, हिरामण कोळी आदी पदाधिकारी-सदस्य उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पनवेल रेल्वे स्थानकात समस्यांचा पाऊस ; रेल्वे मंत्रालय सल्लागार समिती सदस्य अभिजीत पाटील यांनी केली पाहणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वेस्थानकाचा मेकओव्हर केला जाणार आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळासह या परिसरात येऊ घातलेल्या विविध प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर या स्थानकाला वेगळे महत्त्व प्राप्त होणार आहे. मात्र पनवेल रेल्वे स्टेशन मध्ये समस्यांचा पाऊस सुरू असल्याचे प्रवासी सांगत आहेत.

कोरोना काळात उपनगरीय रेल्वे सेवा सर्व सामान्यांसाठी बंद जरी असली तरी लांब पल्यांची रेल्वे सेवा सुरू आहे. पनवेल स्थानकातून परराज्यात जाणाऱ्या १५ ते २० गाड्या रोज येत असतात. अशात प्रवाशांकडून बऱ्याच तक्रारी भारतीय रेल्वे मंत्रालय सल्लागार समिती सदस्य अभिजीत पाटील यांच्याकडे आल्या होत्या. त्या नंतर अभिजीत पाटील यांनी पनवेल स्टेशन प्रबंधक यांची भेट घेत प्रवाष्याना होत असलेल्या समस्येचां पाढाच वाचला . यावेळी त्यांच्या सह पनवेल प्रवासी संघटनेचे अध्यक्ष डॉ भक्तिकुमार दवे, यशवंतराव ठाकरे – पनवेल प्रवासी संघाचे उपाध्यक्ष, डॉ. मनीष बेहरे, पनवेल प्रवासी संघ सदस्य , कुणाल लोंढे, रेल्वे स्थानक स्थानीय प्रवासी संघटनेचे सल्लागार उपस्थित होते. यावेळी नागपूर ते गोवा, मडगाव रेल्वे सेवा ही फक्त सन आणि उत्सवांच्या वेळीच सुरू असते मात्र. पनवेल आणि आजूबाजूच्या शहरात विदर्भात तसेच कोकण, आणि गोव्याला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने ही रेल सेवा दररोज सुरू करावी अशी प्रमुख मागणी केली.

पनवेल रेल्वे स्थानकामध्ये ७ फलाट असून त्यातील ४ उपनगरी तर ३ लांब पल्लूयाच्या गाड्यांकरिता वापरले जातात. लांब पल्लूयांच्या गाड्या ५ , ६ आणि ७ प्लॅटफॉर्म वरून वाहतूक सुरू असते. मात्र अश्यात प्रवाश्यांना शौचालयासाठी फक्त एकच स्वचछतागृह आहे. त्यात पाण्याची व्यवस्था नाही. पर राज्यात जाणाऱ्या गाड्यांची वेळ मागे पुढे होत असते. बऱ्याचदा वाट पाहावी लागते.

रेल्वे स्थानकात एकच विश्राम गृह आहे ते कमी पडत आहे. प्रवाश्यांना ट्रेनची वाट बघत प्लॅटफॉर्म वरच झोपावे लागते. बसण्यासाठी असलेली बाकही मोडकळीस आलेली आहेत. त्यात पिण्याच्या पाण्यासाठी असलेली नळ सुरूच असलेली पाहायला मिळतात. त्याचे पाणी सुद्धा प्लॅटफॉर्म वर वाहत असते. त्यात बऱ्याच ठिकाणी खड्डे आहेत. प्लॅटफॉर्म वर इलेक्ट्रिक ऊ रिरपळ त्यातील





वायरी बाहेर पडलेल्या आहेत. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्येष्ठ. नागरिकांसाठी लिफ्ट ची सुविधा तसेच सर्व प्लॅटफॉर्म वर एक्सलेटर सुरू करावे जे फक्त एकच ठिकाणी सुरू आहे. या आणि अशा अनेक समस्या पनवेलचे स्टेशन प्रबंधक यांच्या समोर मांडल्या.

अभिजीत पाटील यांची नुकतीच रेल्वे मंत्रालय सल्लागार समिती सदस्यपदी निवड झाली आहे. रेल्वे बोर्डाच्या समितीवर निवड होताच अभिजीत पाटील यांनी कामाचा तडाखा सुरू केला आहे. पनवेल रेल्वे स्टेशन आणि प्रवश्याना जाणवलेल्या समस्या अभिजीत पाटील यांनी स्टेशन प्रबंधक यांच्यासमोर मांडल्या आणि त्या समस्या सोडविण्याचे आ– पले आद्य कर्तव्य असल्याचे ठणकावून सांगितले. यानंतर स्टेशन बंधक यांनी लगेच समस्यांचे निराकरण करण्याचे आदेश संबधित अधिकारी आणि कांत्रादरास दिले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिडकोचा 'नैना' प्रकल्प, मेट्रोचे जाळे, जेएनपीटीचा विस्तार तसेच शिवडी–न्हावाशिवा सी–लिंक व नेरुळ–उरण रेल्वे आदीमुळे रायगड जिल्ह्याला महत्त्व प्राप्त होणार आहे. भविष्यात विकासाचा केंद्रबिंदू पनवेल ठरणार आहे. सध्याच्या पनवेल स्थानकातून अनेक लांबपल्लूयाच्या गाड्या सुटतात, त्यामुळे स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी असते. भविष्यात या स्थानकांवर ताण वाढण्याची शक्यता आहे.या पार्श्वभूमीवर काळाची गरज म्हणून पनवेल स्थानकाचा मेकओव्हर करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. तसा प्रस्ताव मध्य रेल्वेला सादर करण्यात आला होता. मध्य रेल्वेच्या मान्यतेनंतर स्थानकाच्या विस्तारीकरणाचा आराखडाही तयार करण्यात आला आहे. सीएसएमटीच्या पार्श्वभूमीवर या स्थानकाचा विकास करण्याची योजना आहे. पनवेल आणि परिसराचा भविष्यकालीन विकास व विस्तार लक्षात घेवून या स्थानकात अत्याधुनिक दर्जाच्या सोयी–सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत. फलाटांची संख्या वाढवण्याचे काम सुरू आणखी तीन फलाटांची वाढ अडीच हजार कोटी खर्चाचा सीएसटी–पनवेल कॉरिडोर प्रकल्पात सिडकोचा ६७ टक्के तर रेल्वेचा ३३ टक्के सहभाग असणार.

# अलिबाग तालुक्यात जागतिक आदिवासी दिन साजरा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील आदिवासी सामाजिक संस्था व सागवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने दि.९ ऑगस्ट रोजी सागवाडी येथे जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

बँक ऑफ इंडिया चे प्रबंधक विजय कुलकर्णी, रायगड जिल्हा माजी कृषी अधिकारी दिलीप भड, शाखा अभियंता, पाणी पुरवठा अधिकारी चोपडे, रोटरी क्लब चे सी.ए.गौरव माळी, तसेच स्टार प्रशिक्षण केंद्र (रायगड) प्रशिक्षक मीना कांबळी,प्रसाद पाटील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी माजी कृषी अधिकारी दिलीप भड यांनी रोटरी क्लबच्या माध्यमातून केलेल्या विविध कामांची माहिती दिली. आदिवासी बांधवांनी कोणतीही भीडभाड न ठेवता समोर यावे. याबाबत गौरव माळी यांनी आवाहन केले तर शासनाच्या विविध योजना सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना,आदी.योजनांबाबत बँक ऑफ इंडिया चे प्रबंधक विजय कुलकर्णी यांनी सविस्तर माहिती देण्यात येऊन योजनांचा लाभ घ्यावा. असे आवाहन केले.शेवटी आदिवासी बांधवांनी सादर केलेल्या पारंपरिक कलेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पावसाने विश्रांती घेतल्यानंतर ही पर्यटकांची श्रीवर्धन तालुक्याकडे पाठ ; पर्यटन व्यावसायिक आर्थिक विवंचनेत

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

गेल्या पंधरा दिवसांपासून श्रीवर्धन तालुक्यामध्ये पावसाने पूर्णपणे विश्रांती घेतली आहे. दिवसभरात एखाद दुसरी पाच दहा मिनिटांसाठी पावसाची सर कोसळते. परंतु सतत कोसळत असलेल्या मुसळधार पावसाने आता विश्रांती घेतली आहे. पावसाने विश्रांती घेतल्यामुळे बळीराजा देखील सुखावला आहे, कारण भात लावणी झाल्यानंतर शेतामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त प्रमाणात असल्याने लावलेले भात कुसून जाते की काय? अशी भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली होती. परंतु पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतातील पाण्याचा निचरा होऊन आता पाणी कमी झाले आहे.

त्यामुळे भात रोपांची वाढ देखील चांगली होत आहे. मात्र पाऊस थांबून सुद्धा श्रीवर्धन तालुक्यात या वेळेला पर्यटकांनी येण्या कडे नापसंती दर्शवल्याचे पाहायला मिळत आहे. पर्यटकांचे चौकशीसाठी फोन येतात परंतु फोन केल्यानंतर सदर पर्यटन व्यावसायिकाला आपल्या इकडे पूर परिस्थिती कशी आहे? किंवा वादळी वातावरण आहे का? असे प्रश्न पर्यटकांकडून विचारले जातात. दूरचित्रवाणीवरील प्रत्येक बातम्यांच्या चॅनेल वरती सतत कोकणामध्ये अतिवृष्टीची व महापुराची स्थिती अशा प्रकारच्या बातम्या दाखवल्या जात होत्या. त्याचप्रमाणे महाड व चिपळूण शहरातील पूरस्थिती, कोसळणाऱ्या दरडी यांचे सातत्याने दाखवले जाणारे चित्रण यामुळे देखील पर्यटन व्यवसायावर अति गंभीर परिणाम झाल्याचे पर्यटन व्यावसायिकांचे म्हणणे आहे. वास्तविक पाहता कोकणातील जी पर्यटन स्थळे समुद्रकिनारी आहेत अशा ठिकाणी कोणत्याही प्रकारची पूरस्थिती आढळून येत नाही. जरी कितीही पाऊस पडला तरी या ठिकाणचे पाणी निचरा होऊन खाडीमध्ये व समुद्रामध्ये तात्काळ निघून जाते.

महाड व चिपळूण ही शहरे कोकणात असली तरी ती किनारपट्टीपासून ७० ते ८० किलोमीटर सह्याद्री पर्वत रांगांच्या पायथ्याशी आहेत. त्यामुळे सह्याद्री पर्वतावरील घाट माथ्यावरती मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यानंतर या परिसरातील नद्यांना महापूर येतो व याठिकाणी पूर परिस्थिती उद्भवते. किनारपट्टीच्या भागामध्ये फक्त चक्रीवादळ निर्माण झाल्यानंतरच गंभीर परिस्थिती असते.

श्रीवर्धन तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील कोकण किनारपट्टीच्या भागांमध्ये वातावरण एकदम चांगले असून सर्वत्र हिरवळ पसरलेली आहे. तरी पर्यटकांनी या ठिकाणी येण्यासाठी कोणतीही काळजी करु नये असे आवाहन पर्यटन व्यावसायिकांकडून करण्यात येत आहे. श्रीवर्धनच्या आमदार व राज्याच्या पर्यटन राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी देखील श्रीवर्धन तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील किनारपट्टीच्या भागातील पर्यटन व्यवसाय वाढावा यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

---

अर्जदारातर्फे वकील
अॅड.हर्षदा सुनील गडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६४७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०९/२०२१

१) श्रीमती.जयंती आशुतोष मिश्रा
वय वर्षे : ३६, धंदा : गृहिणी
२) कुमार वेद आशुतोष मिश्रा
वय वर्षे : ०६, धंदा : विद्यार्थी
तर्फे अज्ञानपालनकर्ती आई अ.क्र.१
दोघेही रा.फ्लॅट नं.डी–३९, मैत्रेयी
को.ऑप.हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.०८,
सेक्टर नं.१६, नवीन पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ हिचे सासरे व अर्जदार क्र.२ चे आजोबा श्री.सुधीर उर्फ सुधीरचंद्र मधुसूदन मिश्रा यांचे तारीख २८/०५/२००७ रोजी सी.बी.डी. नवी मुंबई येथे निधन झाले. मयत सुधीर उर्फ सुधीरचंद्र मधुसूदन मिश्रा यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे...

**मिळकतीचे वर्णन**

**मैत्रेयी को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमि. या इमारतीमधील फ्लॅट नं.डी–३९, क्षेत्र ८०० चौ.फूट कारपेट आणि टेरेस ४४० चौ.फूट, प्लॉट नं.०८, सेक्टर नं.१६, नवीन पनवेल, जिल्हा : रायगड**

वरील फ्लॅट मिळकतीबाबत अर्जदार यांनी ते मयत सुधीर उर्फ सुधीरचंद्र मधुसूदन मिश्रा, आशुतोष उर्फ आशुतोष सुधीर मिश्रा आणि कुमकुम सुधीरचंद्र मिश्रा यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटी प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे.कोर्टात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.११ माहे ०८ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्रीमती.सुजाता संजय पुदाले या मौजे : मालडुंगे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत त्यांचे विद्यमान मालक श्री.प्रसाद विश्वास आचरेकर यांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**
**मौजे : मालडुंगे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मालडुंगे | ८२/२/अ/१ | २–८४–८० पो.ख. ०–४३–७० एकूण ३–२८–५० पैकी ०–२३–०० क्षेत्रफळाकरिता | ४.५१ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची हमी विद्यमान मालक यांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दि.१२/०८/२०२१
पनवेल

**सही/–**
**अॅड.प्रगती दिनेश ठाकूर**
**नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ऑफिस क्र.२२,**
**वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ,**
**पनवेल–रायगड**
**मो.नं.९१७२५६११११**

---

मा.राव साहेब सो.
अॅड.अनिरुद्ध तुळसणकर, पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९२७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०९/२०२१

१) श्रीमती.शितल जगदीश भोजने
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
२) कुमारी कार्तिकी जगदीश भोजने
वय : १२ वर्षे, धंदा : शिक्षण
क्रं.१ स्वतःकरिता व क्रं.२ चे अज्ञान पालन
करणार आई म्हणून
क्रं.१ व २ रा.फ्लॅट नं.ए–१०१,
ओम दर्शन सोसायटी, प्लॉट नं.ए–५/२,
सेक्टर ७, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.लक्ष्मी पांडुरंग भोजने
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गवाळवाडी, माभळे, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ यांचे वडील आणि अर्जदार क्रं.३ यांचा मुलगा कै.जगदीश पांडुरंग भोजने यांचे निधन मोरे हॉस्पिटल, खांदा कॉलनी येथे दि.०३/११/२०१८ रोजी झाले आहे. श्रीमती.शितल जगदीश भोजने वगैरे ह्यांनी कै.जगदीश पांडुरंग भोजने यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्याासाठी अर्ज केलेला आहे.

कै.जगदीश पांडुरंग भोजने यांच्या नावे असलेल्या स्थावर व जंगम मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**अ) मौजे : नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर ०७ मधील भूखंड क्रं.ए–५/२, वर बांधण्यात आलेल्या ओम दर्शन को.ऑप. हौ.सोसायटी या इमारतीचे ए–विंग मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.१०१, क्षेत्र ३९६ चौरस फुट कारपेट अशा वर्णनाची निवासी सदनिका.**

**ब) मौजे : नवीन पनवेल (प), ता.पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर ०९ मधील भूखंड क्रं.११, वर बांधण्यात आलेल्या अथर्व कृपा को.ऑप. हौ. सोसायटी या इमारतीचे पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.१०४, क्षेत्र ६७.८० चौरस मीटर बिल्टअप अधिक ओपन टेरेस ४.०८ चौ.मीटर अशा वर्णनाची निवासी सदनिका.**

**क) मौजे : खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प), ता.पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर ०९ मधील भूखंड क्रं.२९/४१, वर बांधण्यात आलेल्या वृंदावन (बी) को.ऑप.हौ.सोसायटी या इमारतीचे ए–विंग मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.१०५, क्षेत्र ३२८.१८ चौरस फुट कारपेट अधिक टेरेस ९५.३६ चौ.फुट अशा वर्णनाची निवासी सदनिका.**

**सदरील परिच्छेद २ ब व २ क कडील मिळकतीमध्ये कै.जगदीश पांडुरंग भोजने यांचा निम्मा म्हणजेच ५० टक्के हिस्सा आहे.**

वर श्रीमती.शितल जगदीश भोजने वगैरे ह्या कै.जगदीश पांडुरंग भोजने यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.शितल जगदीश भोजने वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.जगदीश पांडुरंग भोजने यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.११/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.मुजावर साो.
अॅड.शशिकांत काळू म्हात्रे

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१०४९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१०/२०२१

१) कै.सोंग्या आंधळ्या म्हात्रे (मयत) तर्फे वारस
१/१) श्री.जगन्नाथ सोंग्या म्हात्रे
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
१/२) श्री.अरुण सोंग्या म्हात्रे
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
१/३) सौ.निर्मला नरेश पाटील
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.निळजे, पो.पो.काटई, ता.ठाणे, जि.ठाणे
२) श्रीमती.सुंदराबाई पांडुरंग गंधारकर
वय : ७४ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१/१ ते १/३ यांचे आजोबा अर्जदार नं.२ यांचे वडील कै.आंधळ्या काथोर उर्फ काथारी म्हात्रे हे दि.११/०९/१९८४ रोजी मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची पत्नी कै.भिमाबाई आंधळ्या म्हात्रे ह्या दि.५/३/१९८५ रोजी मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच त्यांचा मुलगा कै.सोंग्या आंधळ्या म्हात्रे हे दि.०४/१०/१९८४ रोजी मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहे. कै.आंधळ्या काथोर उर्फ काथारी म्हात्रे यांच्या आई फार वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत.

कै.आंधळ्या काथोर उर्फ काथारी म्हात्रे यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | अॅवार्ड नं./ युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| नावडे | २४/१३ | २२३ | ३ | ०–२०–४ |
| | | २०९ | २ | ०–८–१२ |
| | | २०८ | ९ | ०–०७–८ |
| | | १५३ | ० | ०–२४–८ |
| नावडे | १३ | १०६ | ४ | ०–५–० |
| | | १५७ | २ | ०–८–८ |
| | | १५७ | ३ | ०–११–८ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अॅवॉर्ड हा कै.आंधळ्या काथोर उर्फ काथारी म्हात्रे यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.आंधळ्या काथोर उर्फ काथारी म्हात्रे यांचे वारसदार या नात्याने कै.आंधळ्या काथोर उर्फ काथारी म्हात्रे यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.आंधळ्या काथोर उर्फ काथारी म्हात्रे यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ११/०८/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब
अॅड.राजेश तु. बांगर
अर्जदार तर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९५५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०९/२०२१

१) श्रीमती.सुजाता कैलास पाटील
वय : ३९ वर्षे, धंदा : घरकाम
२) कु.मनिष कैलास पाटील
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.प्रथमेश कैलास पाटील
वय : १० वर्षे, धंदा : शिक्षण
अ.क्रं.२ व ३ करिता अ.पा.क.
आई अर्जदार क्रं.१ सुजाता कै.पाटील
सर्व रा.घोटचाळ, पो.घोटकम्प, नागझरी,
तळोजा ए.वी., ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ व ३ यांचे वडील कै.कैलास महादेव पाटील यांच्या नावे असलेल्या घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : घोट पनवेल महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड**

| असेसमेंट घर क्रं. | मालकाचे नाव | क्षेत्रफळ चौ.फूट |
|---|---|---|
| ६१६ | कै.कैलास महादेव पाटील | ३०×२१ |

कै.कैलास महादेव पाटील हे दि.३०/०४/२०२१ रोजी मु.घर नं.६१६, पो.घोटकॅम्प, नागझरी, तळाजा, ए.वी., ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून, त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने/नी/आपली/ल्या लेखी हरकत/ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

आज दि.११/०८/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

अॅड.शशिकांत काळू म्हात्रे

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.९९३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०९/२०२१

श्रीमती.जयश्री दगडू दळवी
वय : ८३ वर्षे, धंदा : गृहिणी
सहमत कुटीर, कोलकरवाडी, बालविर स्पोर्ट
क्लब, घाटला व्हिलेज, चेंबुर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी सदरहू अर्जदार नं.१ यांचा मुलगा कै.विनोद दगडू साळवी ह्यांचे निधन दि.०३/१०/२०१४ रोजी मौजे : मुंबई येथे झाले आहे. तसेच त्यांचे वडील कै.दगडू बाजीराव दळवी हे दि.२३/०९/२००९ रोजी एल.टी.एम.जी. हॉस्पिटल सायन मुंबई येथे मयत झालेले आहेत.

कै.विनोद दगडू दळवी यांनी त्यांच्या हयातीत खालील वर्णनाची मिळकत विकत घेतलेली आहे त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

**अ) मिळकतीचे वर्णन**

| ठिकाण | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| सदनिका ए–०३, तळमजला, गुलमोहर को. ऑ.सो.लि., खारघर, ता.पनवेल, जि.रायगड | ५२ व ५६ | २० | २७४.३५ चौ.फूट कारपेट |

सदरील मिळकत ही कै.विनोद दगडू दळवी यांनी दि.०९/१२/२००९ रोजी हरिश्चंद्र भागोजी दुदम व हेमांगी भागोजी दुदम यांच्याकडून रक्कम रुपये १०,५५,०००/– (अक्षरी रक्कम दहा लाख पंचावन्न हजार) खरेदीखताने विकत घेतलेली आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.विनोद दगडू दळवी यांचे वारसदार या नात्याने कै.विनोद दगडू दळवी यांचे हिश्श्याचे आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.विनोद दगडू दळवी यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्यबााबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र माागहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.११/०८/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## तळा विभागातील मतदार यादीत फोटो नसलेली नावे वगळण्यात येतील -तहसीलदार तळा

**दै.रायगड नगरी । तळा**

१९३ श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील वंचित मतदारांची नावे पुण्यनगरी वृत्तपत्रातून ५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यापूर्वी अनेक वेळा इडज यांचे मार्फत मतदार यादीसाठी फोटोची मागणी करण्यात आली होती तरी सुद्धा ज्यांनी दिले नाहीत ती नावे प्रसिद्ध करण्यात आली असून सात दिवसात मतदार नोंदणी अधिकारी तथा तळा तहसीलदार यांच्या कार्यालय योग्य वेळेत पुरावा सह सादर करावे अन्यथा शासन आदेशानुसार मतदार यादीतून नावे वगळण्यात येईल तळा विभागातील २७९ मतदारांची नावे प्रसिद्ध झाली असून त्यामध्ये मयत,स्थलांतरित,काही हयात असती अशा मतदारांनी त्वरीत पुर्तता करावी याची नोंद घ्यावी तरी पुन्हा आपणास आवाहन करण्यात येतआहे.अशी माहिती तळा तहसीलदार ए एम् कनशेट्टी यांनी प्रसिद्ध साठी कळविले आहे.

## शिवसेनेच्या वतीने इयत्ता दहावी व बारावीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा करण्यात आला गुणगौरव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पनवेल ग्रामीण भागातील हरिग्राम गावातील स्व. हनुमान म्हात्रे यांच्या स्मरणार्थ शिवसेना शाखा हरिग्राम यांच्या वतीने इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या हस्ते उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बक्षिसे व पुरस्कार देवून त्यांना सन्मानित करण्यात आले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, विधानसभा संघटक दीपक निकम, तालुका संघटक भरत पाटील, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, नवीन पनवेल शहर प्रमुख रूपेश ठोंबरे, शाखाप्रमुख हरिग्राम दिपक घरत, ग्रामपंचायत सदस्य राज्यश्री घरत, सुभाष जले, शिवाजी घरत, दशरथ घरत, प्रमोद घरत, गणेश घरत, भोळेश्वर घरत, रोहित घरत, रोनक घरत, महिला आघाडीच्या विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, तालुका संघटिका अनीता डांगरकर, सौ.मीना सदरे व शिवसेनेचे शाखाप्रमुख, उप शाखाप्रमुख, हरिग्राम गावाचे ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# बेणसे ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सात सदस्यांचा आ.महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यात शिवसेनेला दिवसेंदिवस राजकीय व संघटनात्मक दृष्ट्या मजबुती व बळकटी मिळत आहे. जिल्ह्यात विविध भागातून अन्य पक्षाचे कार्यकर्ते , पदाधिकाऱ्यांचे सेनेत मोठ्या प्रमाणात इन्कमिंग सुरू असून जिल्ह्यात शिवसेनेचा गड अधिकाधिक भक्कम होताना दिसतोय. पेण तालुक्यातील आर्थिक दृष्ट्या सधन व राजकीय दृष्ट्या महत्वपूर्ण असलेल्या बेणसे ग्रामपंचायतीत शेतकरी कामगार पक्षाला जबर हादरा बसला आहे. बेणसे ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंचासह सात सदस्यांनी आपल्या समर्थकांसह दि.(११) बुधवारी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख तथा आ.महेंद्र दळवी व प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीत शिवबंधन हाती बांधत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.




मागील अनेक वर्षे बेणसे ग्रामपंचायत शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखली जायची, तरुण तडफदार व धडाडीचे नेते उद्धव कुथे यांच्या सक्षम नेतृत्वात बेणसे ग्रामपंचायतीवर लाल बावटा दिमाखात फडकत असे, मात्र आता जनहित व विकासाच्या मुद्द्यावर शिवसेना पक्षात प्रवेश करीत असल्याचे यावेळी प्रवेशकर्त्यांनी एकदिलाने व एकमताने स्पष्ट केले. यावेळी सरपंच मधुकर पारधी, उपसरपंच संतोष अडसुळे, कामगार नेते, माजी उपसरपंच तथा विद्यमान सदस्य उद्धव कुथें, माजी सरपंच विद्यमान ग्रा.पं. सदस्य सौ प्रीतीताई कुथें, सदस्य प्रगती गोरे, सूर्यकांत पवार, स्वप्ना पांढरे, माजी उपसरपंच राजेश गोरे, सुलताना मांढरे, आदींसह तंटामुक्त अध्यक्ष मुजीप मोमीन, शौकत पित्तु, साहिल बेनसेकर, इसाक पित्तु , एजाज पठाण, राकेश जवके, नरेश नाकते, सुनील गोरे, सूर्यकांत पवार, मधुकर नाकते, सत्यवान गोरे, विनोद गोरे, नंदकुमार कुथे, विनायक वारगे, गीतेश कुथे, सुलोचना गोरे, रश्मी गोरे आदींसह तरुण, ज्येष्ठ समर्थक कार्यकर्ते यांनी शिवबंधन हाती बांधले. यावेळी जिल्हाप्रमुख तथा आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी प्रवेशकर्त्यांचे स्वागत करून पक्षात मान, सन्मान व प्रतिष्ठा दिली जाईल, तसेच आपल्या विभागातील लोकाभिमुख विकासकामे प्रथम प्राधान्याने केली जातील असे आश्वाशीत केले. तसेच लवकरच शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत प्रवेशकर्त्यांचे जंगी स्वागत होणार असल्याची माहिती यावेळी जिल्हाप्रमुख महेंद्र दळवी यांनी दिली. यावेळी उद्धव कुथे यांनी शिवसेनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर विकासकामे करून पक्षसंघटना मजबुतीवर अधिकाधिक भर देऊ अशी ग्वाही दिली.

## कंटेनर चालकाला मारहाण करुन लुटणारे दोघे लुटारु जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा एमआयडीसीत माल पोहोचविण्यासाठी आलेल्या एका कंटनेर चालकाला लोखंडी सळईने बेदम मारहाण करुन त्याला लुटणाऱ्या दोघा लुटारूंना सुरक्षारक्षकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना घडली. विकास पंडीत जाधव (२०) व लहू शट्टु जाधव (२२) अशी या दोघा लुटारुंची नावे असून तळोजा पोलिसांनी या दोघा लुटारुंना जबरी चोरीच्या गुह्याखाली अटक केली आहे.

या घटनेतील जखमी कंटेनर चालकाचे नाव चंद्रवीर चौधरी (६०) असे असून ते मुळचे मध्यप्रदेश येथील आहेत. तसेच ते अहमदाबाद रोड लाईन्स ट्रान्स्पोर्ट मध्ये कंटेनर चालक म्हणून काम करत आहेत. चौधरी यांनी आपल्या कंटेनरमध्ये भोपाळ मध्यप्रदेश येथून माल भरला होता. त्यानंतर सदरचा माल खाली करण्यासाठी ते तळोजा धानसर येथील रौफ इंटरप्रायजेस येथे आले होते. यावेळी चौधरी यांनी आपला कंटेनर रस्त्याच्या बाजुला उभा करुन रौफ इंटरप्रायजेस कंपनीचा पत्ता विचारण्यासाठी पायी चालत जात होते. यावेळी त्या भागात स्कुटीवरुन आरोपी विकास जाधव व लहू जाधव हे दोघे आले असता, चौधरी यांना दोघां विषयी संशय आला. त्यामुळे ते अशोक लेलँड कंपनीच्या दिशेने जाण्यासाठी निघाले. त्यामुळे आरोपी विकास व लहू या दोघांनी चौधरी यांना पकडून मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांनी अशोक लेलँड कंपनीच्या भिंतीवरुन आतमध्ये उडी टाकून प्रवेश केला. त्यामुळे विकास आणि लहू या दोघांनी देखील त्यांच्या पाठीमागे भिंतीवरुन उडी टाकुन चौधरी यांना लोखंडी सळईने मारहाण केली. तसेच त्यांच्याजवळ असलेली रोख रक्कम लुटली. याचवेळी त्याठिकाणी आलेल्या सुरक्षारक्षकांनी विकास आणि लहू या दोघांना पकडले. त्यानंतर त्यांनी पोलिसांना पाचारण करुन त्यांना पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यानंतर पोलिसांनी दोघांना जबरी चोरीच्या गुह्याखाली अटक केली. या मारहाणीत कंटेरन चालक गंभीर जखमी झाला असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## वाकडी येथे काँक्रीट रस्त्याचे उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे सुरू आहेत. त्याअंतर्गत वाकडी ग्रामपंचायत हद्दीमध्ये रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात आले. या रस्त्याचे भारतीय जनता पार्टीचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि. १०) उद्घाटन करण्यात आले.

पनवेल तालुक्यातील वाकडी ग्रामपंचायत हद्दीमधील हनुमान मंदिर ते दुंदरे रोड या रस्त्याची दूरवस्था झाली होती. त्याअंतर्गत या रस्त्याचे पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीमधून काँक्रीटीकरण करण्यात आले. या रस्त्याचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, नामदेव जमदाडे, माजी सरपंच नरेश पाटील, बाळाराम उसाटकर, भगवान म्हात्रे, माजी सरपंच नारायण भगत, रमेश नावडेकर, रामदास म्हात्रे, दिनेश फडके, रामदास फडके, बाळाराम पाटील, गणेश म्हात्रे, संजय पाटील आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिरनेर येथील डॉक्टरांच्या अविरत सेवेमुळे रुग्णांना दिलासा

**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोनाकाळात मागील दिड वर्षांपासून उरण तालुक्यातील चिरनेर परिसरातील गोरगरीब सर्वसामान्यांची तन-मन-धनाने सेवा करणारे डॉक्टर प्रकाश मेहता तर पनवेलमध्ये राहून कोरोना महामारी मध्ये रुग्णांची विनामूल्य सेवा करणारे चिरनेर गावातील सुपुत्र डॉक्टर नितीन पोवळे हे चिरनेर वासीयांसाठी कोरोना महामारीचे जागतिक संकट असतांना देखील अगदी सुरुवातीपासून पासूनच न घाबरता न डगमगता स्वतःचा जीव धोक्यात घालून रवि क्लिनिक या नावाने गेल्या २० वर्षापासून दवाखाना सुरू असलेल्या डॉक्टर प्रकाश मेहता यांनी कोरोना काळात अहोरात्र वैद्यकीय सेवा सुरू ठेवण्याचे काम केले आहे.त्यामुळे येथील रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

कोरोना सारख्या रोगावर मात करण्यासाठी सातततत्याने लोकांना या कोरोना आजाराविषयी मार्गदर्शन करून चिरनेर ग्रामीण विभागातील कोरोना बाधित रुग्णांना धीर देऊन या कोरोना संसर्गजन्य व्हायरस विषयी प्रबोधन करून आपण यातून नक्कीच बरे होऊ अशी आशा रुग्णांच्या मनात पल्लवीत करून डॉक्टर प्रकाश मेहता व डॉक्टर नितीन पोवळे या दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केलेली कामगिरी निश्चितच अभिमानास्पद असून त्यांच्या या कार्याबाबत समाधान दिसून येत आहे.

चिरनेर पंचक्रोशीतील ग्रामीण भागात विविध प्रकारच्या आजाराचे रुग्ण दिवसेंदिवस दवाखान्यात दाखल होत असतात. यात ताप सर्दी खोकला दम लागणारे असे अनेक रुग्ण दवाखान्यात रोज येत असत मात्र आलेल्या सर्व रुग्णांना आदराची वागणूक देत कोरोनाच्या विषाणू विषयी सर्व नियम अटी शर्ती समजावून सांगून योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन हे डॉक्टर करत असल्याचे पाहावयास मिळत आहे. त्यामुळे आज हजारो रुग्ण बरे होऊन आपल्या कामात धंद्याला लागले आहेत व संसारात गुंतले आहेत.

याचे समाधान डॉक्टर प्रकाश मेहता व डॉक्टर नितीन पोवळे यांच्या चेहर्योवर दिसून येत आहे दररोज सकाळी ९ ते रात्री बारा वाजेपर्यंत रुग्णांना सेवा देणारे डॉक्टर प्रकाश मेहता व नितीन पोवळे यांना कोरोनाकाळात रुग्णांवर उपचार करत असताना खूप चांगले वाईट अनुभव आले तर डॉक्टर नितीन पोवळे हे रुग्णांसाठी आदर्शवत सेवाभावी डॉक्टर आहेत.आज देखील त्यांनी रुग्णांसाठी विनामूल्य सेवा सुरू ठेवली आहे. मागील वर्षी तर त्यांनी येथील जाणकार नागरिकांच्या मदतीने चिरनेर गावात घरोघरी जाऊन गोळ्यांचे वाटप केले होते. अविरत रुग्णसेवेचे व्रत घेतलेल्या या दोन्ही व्यक्तिमत्वा कडून रूग्नसेवेच्या व्रताची परिपूर्ण अशीच अविरतपणे रुग्ण सेवा घडत राहो अशा शब्दातून त्यांना यावेळी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# अभियंत्यांच्या दुर्लक्षामुळे माथेरानच्या रस्त्यांवर निकृष्ट दर्जाचे क्ले पेव्हर ब्लॉक ठेकेदारांची मनमानी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये सध्या मोठ्या प्रमाणात विविध ठिकाणी धूळविरहत रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत त्यामध्ये काही ठिकाणी एमएमआरडीए च्या मार्फत तर काही ठिकाणी नगरपालिकेच्या निधीतून ही अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत असेच एक काम येथील पांडे प्ले ग्राउंड ते शारलेट लेक रस्त्याचे सुरू असून ह्या ठिकाणी क्ले पेव्हर वापरून धूळ विरहित रस्ता करण्यात येत आहे. ह्या ठिकाणी मागील वर्षी जवळ जवळ पन्नास फूट रस्त्याचे काम करण्यात आले होते त्यासाठी वापरण्यात आलेले क्ले पेव्हर निकृष्ट दर्जाचे असल्याने हे काम बंद करण्यात आले होते व नव्याने पुन्हा नवीन ब्लॉक वापरून के काम करण्यात यावे असे ठेकेदारास सांगण्यात आले होते पण हे ब्लॉक तसेच ठेऊन हे काम उरकण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे त्यामुळे सर्वत्र आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

माथेरान मध्ये सध्या पर्यावरण पूरक अशा क्ले पेव्हर ने रस्ता बनविण्यास पर्यावरण सनियंत्रण समितीची परवानगी असल्याने मोठया प्रमाणात कामे सुरू आहेत पण हे क्ले पेव्हर चा उत्पन्न करणारे फार कमी व्यावसायिक आहेत त्यामुळे येथे उच्च दर्जाचे कले पेव्हर सहजासहजी उपलब्द होत नाहीत त्यामुळे ही कामे विलंबाने होत आहेत. त्यातच काही ठेकेदारांनी जवळ मार्ग शोधताना निकृष्ट दर्जाचे क्ले पेव्हर आणून कामे उरकण्यास सुरवात केली होती. पण स्थानिकांच्या आक्षेपांमुळे ही कामे थांबविण्यात आलीत त्यातीलच एक काम पांडे प्ले ग्राउंड ते शारलेट लेक ह्या रस्त्याचे आहे. माथेरान मधील अति महत्वाच्या प्रेक्षणीय स्थळांमध्ये मोडणारा शारलेट लेक हा प्रमुख पॉईंट आहे त्यामुळे येथे नेहमीच वर्दळ असते म्हणूच पालिकेने हा रस्ता चांगला व्हावा म्हणून हे काम तातडीने सुरू केले होते पण मागील दोन अडीच वर्षे होऊन ही काम पूर्णत्वास गेलेले नाही. त्यातच ठेकेदाराने जवळजवळ पन्नास फुटातून अधिक रस्ता निकृष्ट दर्जाचे क्ले पेव्हर लावून घाईगडबडीत पूर्ण केला होता पण त्यास आक्षेप घेतल्यानंतर हे ब्लॉक काढून त्या ठिकाणी योग्य ब्लॉक बसविण्याचे सदर ठेकेदाराला पालिकेकडून सांगण्यात आले होते. पण सदर काम तसेच ठेऊन ठेकेदाराने पुढील काम उरकत घेतले असल्याचे दिसून येत आहे हे काम आता पूर्णत्वास आले असून रद्द करण्यात आलेले ब्लॉक काढणार की नाही अशी विचारणा स्थानिक नागरिकांमधून होत आहे सध्या सुरू असलेले काम ही सरळ नसल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत असून हा रस्ता पालिकेकडे वर्ग करण्याअगोदरच काही ठिकाणी हे ब्लॉक वरखाली झाल्याचे दिसून येत आहेत. अशा प्रकारचे काम होत असताना नगरपालिकेचे अभियंते ह्या ठिकाणी फिरकतात की नाही असा प्रश्न निर्माण होत असून हे निकृष्ट दर्जाचे ब्लॉक अजून तिथेच लावलेले असल्याने त्यास पुष्टी मिळत आहे ह्या ब्लॉक मुळे पालिकेचे लाखो रुपये पाण्यात डुबणार असून त्याकडे संबंधित खात्याने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.



## पनवेल तालुक्यातील मोरबे येथे रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून पनवेल तालुक्यात अनेक विकासाची कामे सुरू आहेत. त्यानुसार मोरबे येथे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक आमदार निधीमधून रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत या विकासकामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि. १०) करण्यात आले.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल तालुक्याचा विकास होत आहे. त्यांच्या स्थानिक आमदार निधीमधून अनेक विकासाची कामे तालुक्यात सुरू आहेत. त्या अंतर्गत मोरबे येथील



एकनाथ नावडेकर यांच्या घरापासून ते मराठी शाळेपर्यंत रस्त्याचे काँक्रिटीकरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून करण्यात येणार आहे. या विकासकामाचे भूमिपूजन भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी वाकडीच्या सरपंच कुंदा पवार, उपसरपंच अरुण पाटील, सदस्य मंगेश पाटील, नीता पाटील, नरेश पाटील, नामदेव जमदाडे, संतोष पाटील, मोरबे ग्रामपंचायतीचे सदस्य रमेश नावडेकर, सदस्या सुवर्णा भगत, लता नाईक, माजी सदस्य नारायण भगत, ज्येष्ठ नेते रामदास म्हात्रे, निवृत्ती नावडेकर, सचिन फडके, बाळाराम उसाटकर, जनार्दन भगत आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुलीच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याबद्दल गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रिक्षातून जाणाऱ्या मुलीचे शर्ट ओढून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

तळोजा फेज २ येथे राहणाऱ्या एका महिलेच्या दोन मुली या मुंब्रावरुन त्या राहत असलेल्या तळोजा फेज २ येथे घरी रिक्षाने येत असताना आरोपी याने लाल रंगाच्या युनिकॉर्न मोटार सायकलवरुन त्यांचा मुंब्रा येथून पाठलाग करून मुंब्रा-पनवेल रोडवर तळोजा ट्रॅफिक पोलीस चौकीच्या विरुद्ध रोडच्या बाजूला आल्या असताना त्या मुलांनी सदर पिडीत मुलीचे शर्ट ओढून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

### सूचना -१

साडेबावीस टक्के योजने अंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार सूचना

**सर्व श्री / श्रीमती. मे. श्री गणेश एंटरप्रायजेस तर्फे भागीदार १) श्री बाबुभाई विरजीभाई पटेल २) नितीन बाबुभाई गजीपारा ३) बाबुभाई विरजीभाई पटेल (एच.यु.एफ) ४) नितीन बाबुभाई गाजीपारा (एच.यु.एफ)**

**राहणार -B-९०३, श्री जी हाईट्स, प्लॉट नं. १ ABC, सेक्टर ४६, नेरूळ ४००७०६.**

-------- (अर्जदार)

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजने अंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. दिव्यज्योत डेव्हलपर्स तर्फे भागीदार जीग्नेश राजूभाई वाघानी, श्रीमती रूपम कल्पेश वाघानी आणि श्रीमती गौरीबेन दयालभाई पटेल (हस्तांतरण अर्जदार)** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक | प्रथम त्रिपक्षीय करारनामा केलेला दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | | |
| १८३८ | ०७.०७.२०२१ | पुष्पक नोड (उलवे) | २६ | ३५९ | २६९० | ०३.०७.२०१९ | २३.०७.२०१९ | २५/०२/२०२० |

या सूचनेद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहित **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/१७८/२०२१-२२**